


# डॉ. वा.ना. बेडेकर

## तेरावा स्मृतीदिन

शुक्रवार, दिनांक १४ एप्रिल २०१७

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

डॉ. बेडेकर विद्या मंदीर, नौपाडा, ठाणे ४०० ६०२ दूरध्वनी : २५४२ ६२७०
गणपत्र : vpmt@vsnl.net संकेतस्थळ : www.vpmthane.org

## शैक्षणिक संस्थांचा समुह

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | **डॉ. बेडेकर विद्या मंदिर – मराठी माध्यम शाळा**<br>(पूर्वीची रजिस्टर्ड खाजगी मराठी शाळा – १९३४) | १९५८ |
| २ | **बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मुल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ३ | **के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय**<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मुल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ४ | **विप्रमंचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे मुल्यांकित) | १९७२ |
| ५ | **विप्रमंचे डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था**<br>(पूर्वीची औद्योगिक व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था), एआयसीटीई मान्यताप्राप्त | १९७३ |
| ६ | **सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा** | १९७६ |
| ७ | **विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**<br>(राष्ट्रीय मुल्यांकन – NAB तर्फे मुल्यांकित एआयसीटीई मान्यताप्राप्त) | १९८३ |
| ८ | **विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र** | १९९६ |
| ९ | **विप्रमंचे तंत्रनिकेतन – माहिती व तंत्रज्ञान केंद्र** | २००० |
| १० | **विप्रमंचे परदेशी भाषा अभ्यास केंद्र** | २००८ |
| ११ | **विप्रमंचे संरक्षण व व्यूहरचना अभ्यास केंद्र** | २००८ |
| १२ | **विप्रमंची लंडन ॲकेडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, लंडन** | २००९ |
| १३ | **विप्रमंचे आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन केंद्र** | २००९ |
| १४ | **विप्रमंचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर, जिल्हा रत्नागिरी** | २०१२ |
| १५ | **विप्रमंची दुरस्थ शिक्षण संस्था** | २०१२ |
| १६ | **विप्रमंचे व्यवसाय आणि कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र** | २०१४ |
| १७ | **विप्रमंची ज्येष्ठ शास्त्रज्ञांची समिती** | २०१६ |

डॉ. वा.ना. बेडेकर
तेरावा स्मृतीदिन
शुक्रवार, दिनांक १४ एप्रिल २०१७

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप,
ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, ठाणे (प.) – ४०० ६०१.

विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर
यांच्या तेराव्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम
शुक्रवार, दिनांक १४ एप्रिल २०१७ रोजी
सकाळी १०.३० वाजता आयोजित केला आहे.
या स्मृतीदिनानिमित्त ''जागतिक स्तरावरील संस्कृत'' या
विषयावर प्रा. डॉ. श्रीकान्त बहुलकर यांचे व्याख्यान होईल.
तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे ही विनंती.

आपला,



डॉ. विजय बेडेकर
कार्याध्यक्ष

**प्रा. डॉ. श्रीकान्त बहुलकर**

प्रा. डॉ. श्रीकान्त बहुलकर हे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे भूतपूर्व मानद सचिव असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली विभागामध्ये कुलगुरुनियुक्त संलग्न प्राध्यापक आहेत. वेद, संस्कृत साहित्य, बौद्ध वाङ्मय व तत्त्वज्ञान, तिबेटी बौद्ध धर्म हे त्यांच्या अभ्यासाचे विषय असून त्या क्षेत्रात ते गेली चाळीस वर्षे ते अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करीत आहेत. १९७७ साली पुणे विद्यापीठातून वेदातील वैद्यक या विषयावर संशोधन करून त्यांनी विद्यावाचस्पती ही पदवी प्राप्त केली. १९७८ साली जपान शासनाची शिष्यवृत्ती मिळवून त्यांनी तेथील नागोया विद्यापीठात जपानी व तिबेटी भाषा आणि बौद्ध धर्म व तत्त्वज्ञान या विषयाच्या अभ्यासास प्रारंभ केला. डेक्कन कॉलेज व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ या संस्थांमध्ये त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले. वाराणसी जवळील सारनाथ या ठिकाणी केंद्र शासनाने स्थापन केलेल्या Central University of Tibetan Studies या विद्यापीठाने त्यांची संशोधन विभागाच्या प्रमुख पदावर नियुक्ती केली. त्या ठिकाणी त्यांनी दुर्मीळ बौद्ध संस्कृत ग्रंथ आणि त्यांचे तिबेटी भाषेतील प्राचीन अनुवाद यांचे चिकित्सापूर्ण संपादन केले. वेद आणि बौद्ध विद्या य़ा विषयाचे तज्ज्ञ म्हणून त्यांना आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झाली आहे. कॅनडा, जर्मनी, जपान, अमेरिका या देशांमधील विद्यापीठांमध्ये त्यांनी अभ्यागत प्राध्यापक या पदावर कार्य केले आहे. त्यांनी नऊ विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती पदवीसाठी आणि चार विद्यार्थ्यांना विद्यानिष्णात पदवीसाठी मार्गदर्शन केले आहे. त्यांनी ११ ग्रंथांचे लेखन व संपादन केले असून सुमारे ७० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या वयाच्या सदतिसाव्या वर्षी त्यांची राष्ट्रीय व्याख्याता या पदावर नियुक्ती केली. अथर्ववेदाच्या परंपरेच्या संशोधनासाठी ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाने त्यांना शिवदासानी फेलो म्हणून नियुक्त केले. Numata Visiting Professor of Buddhist Studies या प्रतिष्ठित पदावर हार्वर्ड युनिव्हर्सिटीने केलेली त्यांची नियुक्ती हा त्यांच्या संशोधन कार्याचा मोठा बहुमान आहे. या पदावर नियुक्त झालेले ते एकमेव भारतीय विद्वान आहेत.

---

**प्रथम स्मृतीदिन** – विषय : भारत आणि संगणक; **वक्ता** : डॉ. दीपक फाटक

**द्वितीय स्मृतीदिन** – विषय : जागतिक अर्थकारणात आशियाई वर्चस्वासाठी शिक्षणाचे महत्त्व; **वक्ता :** प्रा. वाय. के. भूषण

**तृतिय स्मृतीदिन** – विषय : जागतिकीकरण आणि भारतीय अर्थकारण – परिणाम आणि दिशा; **वक्ता :** डॉ. विष्णू कान्हेरे

**चतुर्थ स्मृतीदिन** – विषय : भारतीय दर्शनशास्त्रामधील घटितार्थशास्त्र आणि विरचना; **वक्ता :** डॉ. आर. बाळसुब्रमनियन

**पाचवा स्मृतीदिन** – विषय : विज्ञान आणि समाज : वसाहतवादाच्या पार्श्वभूमिवर घ्यायचा बोध; **वक्ता :** डॉ. दीपक कुमार

**सहावा स्मृतीदिन** – विषय : ऐतिहासिक दृष्टीकोनातून भारतीय विज्ञान व धर्म; **वक्ता :** प्रा. वी. व्ही. सुब्बारायप्पा

**सातवा स्मृतीदिन** – विषय : शैक्षणिक उत्तमतेकरिता स्वायत्ततेची गरज?; **वक्ता :** प्रा. राम ताकवले

**आठवा स्मृतीदिन** – विषय : महाराष्ट्राची सांस्कृतिक जडण घडण – पुरातत्वीय पुरावा; **वक्ता :** डॉ. म. के. ढवळीकर

**नववा स्मृतीदिन** – विषय : कॅलक्युलस चा विकास आणि उगम भारतामध्ये; **वक्ता :** प्रा. रामासुब्रमनियन्

**दहावा स्मृतीदिन** – विषय : सामूहिक अध्ययन, सुसंस्कृत समाजनिर्मितीचे एक साधन; **वक्ता :** प्रा. बी. के. पासी

**अकरावा स्मृतीदिन** –विषय : ''कलेतिहास, पुरातत्त्व आणि प्रतिमा– विज्ञान''; **वक्ता :** डॉ. अरविंद जामखेडकर

**बारावा स्मृतीदिन**–विषय : ''आपले अस्तित्त्व''; **वक्ता : प्रा.** डॉ. गो. ब. देगलुरकर